महाराष्ट्र शासन

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना

गटनं.४८८, मोतीबागेजवळ,जालना-४३१२०३

E-mail:-principaldietjalna@gmail.com Website:-www.dietjalna.in दूरध्वनी क्रमांक: -०२४८२-२२३२४

जाक्र/जिशिवप्रसंजा/ शिक्षक स्पर्धा/२०२५-२६/४९२ दिनांक:-२८/१०/२०२५

**प्रति,**

**१.मा. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (सर्व)**
**२. मा.प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)**
**३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (सर्व)**
**४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) (सर्व)**
**५. गटशिक्षणाधिकारी, पथायत समिती, (सर्व)**
**६. प्रशासन अधिकारी, मनपा, नपा (सर्व)**

**विषय: - शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विविध स्पर्धाचे आयोजन करणेबाबत......**

**संदर्भ**: १. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०.
२. राज्य अभ्यासक्रम आराखडा-२०२४.
३. मा संचालक, रा.शै.स.प्र.प.म.पुणे याचे पत्र क्र. जा.क्र. साव्यावि/राशैसंवप्रप/शिक्षक स्पर्धा/२०२५-२६/१/१४९०२७३/२०२५.दि.१०-१०-२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, DIET मधील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करणे, त्यांच्यात समन्वय, सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या डिजिटल, भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्याच्या उद्देशाने तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून करण्यात येत आहे.

या स्पर्धांच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा ह्या एकूण ४२ विषयांवर आधारित असणार आहेत. नमूद स्पर्धाचे निकष व नियमावली बाबतची सविस्तर माहिती शिक्षक व अधिकारी/कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका ह्या पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यानी सदर पुस्तिकेत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे. सदर पुस्तिका ही राज्य शैक्षणिक सशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ह्या संस्थेच्या www.maa.ac.in ह्या संकेतस्थळावर उपयुक्त या टॅबवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील नियोजनानुसार सन २०२५ २६ वर्षांपासून एकूण ४२ स्पर्धांचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे याच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व DIET कडून आयोजित करण्यात येणार आहे. याबाबत संबंधित DIET कडून मार्गदर्शक सूचना पत्र दिले जाणार आहे. त्यानुसार तालुकास्तरावर स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे.

वरील ४२ स्पर्धांपैकी विविध क्लब स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजनाची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना यांचेकडे देण्यात आलेली आहे. त्यानुसार विविध क्लब स्पर्धा आयोजनाबाबतच्या सूचना खालील प्रमाणे आहेत.
विविध क्लब स्पर्धा आयोजनाबाबत सूचना-

संदर्भ क्र.५ च्या पत्रानुसार नोव्हेबर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी म्हणजेच ७ नोव्हेंबर रोजी प्रत्येक तालुकास्तरावर स्पर्धा घेण्याचे नियोजित आहे त्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. १. स्पर्धेसाठी नाव नोंदणीसाठी जिल्हा / राज्य यांचेकडून केंद्रप्रमुख यांना लिंक देण्यात येईल.

२. केंद्रप्रमुख यांनी प्रत्येक स्पर्धेसाठी केंद्रातून एका शिक्षकाचे नाव स्पर्धेसाठी लिंकवर नोंदवावे.

३. प्रत्येक स्पर्धेत केंद्रातील किमान एका शिक्षकाने सहभाग घेणेबाबत प्रोत्साहित करण्यात यावे.

४. स्पर्धानिहाय सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांची / शिक्षकाची लेखी संमती घ्यावी व स्पर्धेवेळी आयोजकांकडे सादर करावी.

५. सर्व स्पर्धासाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केले जाईल,

६. केवळ केंद्रप्रमुख यांना लिंक पाठविली जाईल व केंद्रप्रमुख यांनी स्वतः शिक्षकांची क्षमता, कौशल्य पाहून नामनिर्देशन करावे.

७. दि. ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी शिक्षकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

८. वैयक्तिक तालुकास्तरावरील प्रत्येक स्पर्धेचा विजेता विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील.

९. या स्पर्धाची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०. तालुकास्तरावर वरील स्पर्धाची जबाबदारी ही गटशिक्षणाधिकारी याची राहील गटशिक्षणाधिकारी यांनी तालुकास्तरीय समितीच्या मदतीने तालुकास्तरीय स्पर्धा विहित वेळेत पार पाडाव्यात.

११. तालुकास्तरीय स्पर्धेसाठी सक्षम परीक्षकाची नावे अंतिम करून DIET कडे बायोडाटासह दि. ३१/१०/२०२५ पर्यंत पाठवावी. तसेच स्पर्धेचे ठिकाण ही कळवावे.

१२. स्पर्धेच्या नियमावली सोबत जोडलेल्या समितीच्या बैठकीचे आयोजन करून स्पर्धेविषयी माहिती द्यावी व तालुकास्तरीय स्पर्धा गटशिक्षणाधिकारी यानी, विभाग स्तर व राज्यस्तर स्पर्धांचे आयोजन संबंधित जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था यांनी एससीईआरटी पुणे कडील नियोजनानुसार करण्यात यावे. याबाबत आवश्यकतेनुसार वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

प्रत्येक स्पर्धेसाठी तीन परीक्षकाची निवड करण्यात यावी परीक्षकासाठी एससीईआरटी, पुणे कडून निधी प्राप्त झाल्यास स्पर्धेच्या दिवसासाठी निर्धारित मानधन देण्यात येईल.

सोबत - १. संभाव्य स्पर्धा नियोजन/आयोजन

२. शिक्षक व अधिकारी कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिका

३. विविध क्लब स्पर्धा नियमावली

(डॉ.विक्रम सारूक)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
जालना

**प्रतिलिपी:**- मा.संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

## शाळामधील विविध क्लब व त्यांच्या स्पर्धा

**> विविध क्लबच्या स्पर्धा आयोजनाची उद्दिष्टे:-**

१) शाळांमध्ये स्पर्धात्मक वातावरण तयार करणे.

२) शाळांमध्ये संघ भावनेची रुजवणुक करणे,

३) शाळांमध्ये शालेय संस्कृतीसाठी पोषक वातावरण तयार करणे.

४) विविध क्लबच्या माध्यमातून शालेय गुणवत्ता विकास करणे.

५) शाळांमध्ये अध्ययन-अध्यपानास पोषक वातावरण निर्माण करणे.

६) विविध क्लबच्या माध्यमातून शाळांमध्ये शाश्वत विकासाची मूल्ये रुजविणे.

**> स्पर्धेचे स्वरूप व नियम**

1) प्रस्तुत स्पर्धेमध्ये सर्व माध्यमाच्या स्थानिक स्वराज संस्था व खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांना (इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या) सहभाग नोंदवता येईल.

2) शाळेने शिक्षकांनी सहभाग नोंदविलेल्या क्लब अंतर्गत (जून 2024 ते ऑगस्ट 2025) या कालावधीतील कार्याचे सादरीकरण अपेक्षित आहे.

3) सहभाग नोंदविलेल्या शाळेने ज्या क्लब मध्ये सहभाग नोंदविला आहे, त्या क्लबचे कामकाज पाहणारे शिक्षकच सहभागी होतील.

4) शाळांमध्ये असणाऱ्या विविध क्लबपैकी ज्या क्लबमध्ये शाळेची कामगिरी उत्तम आहे, अशा फक्त एकाच क्लबचा सहभाग शाळेने नोंदवावा.

5) सदर स्पर्धा ही तालुका, विभाग आणि राज्य स्तर अशा प्रकारे संपन्न होईल.

6) तालुकास्तरावर प्रत्येक तालुक्यातून सर्वोत्तम तीन क्लबची विहित मूल्यांकनानुसार निवड जिल्हास्तर स्पर्धेसाठी करण्यात येईल, परंतु जिल्हास्तर स्पर्धेसाठी केवळ प्रथम क्रमांकाचा क्लब पात्र असेल.

7) जिल्हास्तरावर सर्वोत्तम तीन क्लबची निवड करण्यात येईल, परंतु त्यातील प्रथम क्रमांकाचा संघच राज्यस्तर स्पर्धेसाठी पात्र असेल.

8) राज्यस्तर स्पर्धेमध्ये विविध जिल्ह्यातून आलेल्या क्लबमधून सर्वोतम तीन क्लबची निवड करण्यात येईल व ते क्लब शाळा पारितोषिकासाठी पात्र असतील.

**> विविध क्लब व स्पर्धेचे निकष**

१.क्लबची उद्दिष्टे संबंधित शाळेने निश्चित करावीत.

२.क्लबमधील विद्यार्थ्यांचा सहभाग किमान 15 किंवा त्यापेक्षा जास्त असावा.

3.क्लबअंतर्गत मूल्यमापन कालावधीत राबवलेले उपक्रम/कृती किती व कोणते आहेत.

४.क्लबमधील उपक्रमांचा/कृतींचा विद्यार्थ्यांच्या शिकण्यात झालेला परिणाम निश्चित करावा.

5.क्लबची नाविन्यपूर्णता आणि उपक्रमशीलता पडताळून पहावी.

६.क्लबमधील कृतींचा उपयोग विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाशी जोडावा.

7.क्लबअंतर्गत झालेले उल्लेखनीय कार्य स्पष्ट करावे.

8.क्लबच्या कार्याचा एकंदरीत परिणाम नमूद करावा.

**> स्पर्धा आयोजनाची जबाबदारी**

1) तालुकास्तरावर विविध क्लबच्या स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी यांची राहील.

2) तालुकास्तर मूल्यांकन समिती ही विविध क्लबची प्रत्यक्ष पाहणी करूनच शाळांची जिल्हास्तर स्पर्धेसाठी निवड करतील.

3) तालुक्यातून सहभागी शाळांची किंवा क्लबची संख्या अधिक असेल तर, केंद्रस्तरातून प्रत्येकी सर्वोत्तम एकेक शाळांची निवड तालुका स्तरासाठी करण्याबाबत गटशिक्षणाधिकारी नियोजन करतील.

4) विभागस्तरासाठी विविध क्लबच्या स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी प्राचार्य, विभागीय जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांची असेल, विभागस्तर मूल्यांकन समिती ही विहित निकषानुसार शाळांची निवड करून सर्वोत्तम शाळा राज्यस्तरासाठी पाठवतील.

5) राज्यस्तरासाठी पात्र झालेल्या शाळांचे मूल्यमापन राज्यस्तर समितीद्वारे केले जाईल.

**> मूल्यांकनाचे निकष**

1.क्लबची उद्दिष्टे

2.क्लबमधील विद्यार्थ्यांचा सहभाग (किमान 15 किंवा त्यापेक्षा जास्त)

3. क्लबअंतर्गत मूल्यमापन कालावधीत राबवलेले उपक्रम/कृती (किती व कोणते)

4.क्लबमधील उपक्रमांचा/कृतींचा विद्यार्थ्यांच्या शिकण्यात झालेला परिणाम

5. नाविन्यपूर्णता आणि उपक्रमशीलता

6. क्लबमधील कृतींचा दैनंदिन जीवनातील उपयोग

7.क्लबअंतर्गत झालेले उल्लेखनीय कार्य

8.एकंदरीत परिणाम

## ➤ Various Club

1. Subject wise clubs language, science, maths and other subject
2. Sport clubs
3. Curricular and Co-curricular activities clubs
4. Student union club
5. Current affairs club
6. General knowledge club
7. Sanitation, health and campus safety club
8. Environment club.
9. Robotics and machines club
10. IT AND Al club
11. Event management club
12. Social work and survey club
13. Library club
14. Astronomy club
15. Alumni relation club
16. CWSN club
17. Weak students helping club
18. Kitchen and kitchen garden club
19. Vocational club
20. Complaint monitoring club
21. Mental ability and tricky Questions club
22. Foreign language club
23. Other

# तालुका स्तरीय विविध क्लब सादरीकरण स्पर्धा

गुणदान तक्ता

| | | क्लबची उद्दिष्टे | | विद्यार्थी सहभाग | | राबविलेले उपक्रम व कृती | | | क्लबचा परिणाम व प्रभाव | | | नावीन्यपूर्णता | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 10 | | 10 | | 30 | | | 25 | | | 25 | | | 100 |
| | | क्लब नाव | ध्येय व उद्दिष्टे, निय | समान संधी | नेतृत्व विकास | वेळापत्रक | ध्येय व उद्दिष्टे साध्यता | फोटो व अहवाल | कौशल्य | सहकार्य | सकारात्मक बाबी | स्थानिक समस्या आधारित | जीवनकौशल्यात | व्यवहार्य/ अमलात आणण्यायोग्य | |
| अनु. क्र. | स्पर्धकाचे नाव | 5 | 5 | 5 | 5 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 5 | 10 | 10 | 5 | 100 |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | परीक्षक 1 स्वाक्षरी | | परीक्षक 2 स्वाक्षरी | | | | | परीक्षक3 स्वाक्षरी | | | | | गटशिक्षणाधिकारी स्वाक्षरी | | |
| | | | | | | | | | | | | | | | |
| | नाव | | नाव | | | | | नाव | | | | | तालुका | | |
| | पदनाम | | पदनाम | | | | | पदनाम | | | | | | | |